धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शासनमान्य खाजगी अनुदानित/ विना अनुदानित, नगरपालिका,नगरपरिषद शाळा व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजनेंतर्गत अनुदान वितरण २०१७-१८

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः अविवि-२०१७/प्र.क्र.१४४/का-६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
तारीख:- ३१ मार्च, २०१८

वाचा :

१) शासन निर्णय क्रमांकः अविवि-२०१०/प्र.क्र.८०/१५/का-६, दि.०७.१०.२०१५
२) शासन शुध्दीपत्रक क्रमांकः अविवि-२०१०/प्र.क्र.८०/१५/का-६, दि.०८.१०.२०१५
३) शासन निर्णय क्रमांकः अविवि-२०१७/प्र.क्र.१४४/का-६, दि.२३.०१.२०१८
४) शासन निर्णय क्रमांकः अविवि-२०१७/प्र.क्र.१४४/का-६, दि.१५.०३.२०१८
५) शासन निर्णय क्रमांकः अविवि-२०१७/प्र.क्र.१४४/का-६, दि.२६.०३.२०१८
६) जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम यांचे पत्र क्र. जा.क्र.नियोजन/अल्पसंख्यांक/१३८३/१८, दिनांक १३.०३.२०१८
७) जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा यांचे पत्र क्र. कावि/अका/अल्पसंख्यांक कक्ष/१९५/२०१८, दि. २८.०३.२०१८
८) जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांचे पत्र क्र.का. जिनिस/अल्पसंख्यांक/४१/२०१८,दि.२७.०३.२०१८
९) जिल्हाधिकारी कार्यालय,गडचिरोली यांचे पत्र क्र. जिनिस/गड/संस-३/ अल्पसंख्यांक /४२ /२०१८,दि. २६.०३.२०१८

प्रस्तावना -

धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शासनमान्य खाजगी अनुदानित/विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित शाळा, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपालिका /नगरपरिषद शाळा व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना दि.०७.१०.२०१५ च्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित करण्यात आली आहे.सदरहू योजनेंतर्गत संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावातील पात्र शाळांना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता अनुदान मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय निवड समितीने उपरोक्त शासन निर्णयानुसार त्यांचेकडे प्राप्त अर्जांची छाननी केली असून छाननीअंती पात्र शाळांची यादी, शिफारशी व आवश्यक निधीच्या मागणीसह मंजूरीकरिता शासनाकडे पाठविली आहे. सर्व संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची दि.०७.१०.२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील अटी व शर्ती नुसार शासनस्तरावर पुन:श्च छाननी करुन अपूर्ण किंवा त्रुटी असलेले प्रस्ताव अपात्र करण्यात आले आहेत. या छाननीअंती पात्र ठरलेल्या शाळांची व त्यांस मंजूर करावयाच्या (कमाल मर्यादा प्रत्येक शाळेसाठी रू.२.०० लाख) अनुदानाची रक्कम खालीलप्रमाणे आहे :-

अ.क्र.	विभाग	जिल्हा	पात्र शाळांची संख्या	मंजूर करण्यात येत असलेले अनुदान (रु. लाखात)
१.	**अमरावती विभाग**	वाशिम	०२	०४.००
२.		बुलडाणा	०२	०४.००
३.	**नागपूर**	वर्धा	०१	०२.००
४.		गडचिरोली	०१	०२.००
		एकूण	**०६**	**१२.००/-**

उपरोक्त तक्यात दर्शविल्याप्रमाणे **एकूण रु.१२.०० लाख (रूपये बारा लाख)** इतके अनुदान या योजनेंतर्गत या शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात येत असून, सदर निधी संबंधित जिल्हाधिकारी यांच्या स्वाधीन करण्यात येत आहे. संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांना सदर निधीसाठी आहरण, संवितरण व नियत्रंक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. यानुसार अनुदान मंजूर केलेल्या पात्र शाळांची नावे, मागणीचे स्वरुप, यापूर्वी अनुदानाचा लाभ घेतल्याचे वर्ष याचा तपशील या शासन निर्णया सोबतच्या सहपत्रामध्ये दर्शविण्यात आला आहे. संबंधित जिल्हाधिकारी, यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या निधीच्या मर्यादेत अनुदानाचे वितरण प्रणालीतून (BDS) आहरण व संवितरण करण्यास खालील बाबींच्या पूर्ततेच्या /खातरजमा करण्याच्या अटीच्या अधीन राहून वितरण करण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

२. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावामध्ये एकाच DIES CODE/ INSTITUTE CODE/ लायसन्स क्रमांकांसाठी एकापेक्षा जास्त प्रस्ताव प्राप्त झाल्याचे तसेच एकाच इमारतीत/ आवारातील एकाच संस्थेच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांसाठी एक पेक्षा जास्त प्रस्ताव प्राप्त झाल्याची बाब शासनाच्या निर्दशनास आली आहे. तथापि, दि. ०७.१०.२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार एका DIES CODE/INSTITUTE CODE/लायसन्स क्रमांकासाठी फक्त एकदाच अनुदान देण्यात येईल तसेच, एकाच इमारतीत/आवारात एकाच संस्थेच्या प्राथमिक, माध्यमिक,उच्च माध्यमिक अशा वेगवेगळया शाळा/महाविद्यालये हे दिवसभरातील स्वतंत्र वेळापत्रकानुसार वेग वेगळया पाळीत/सत्रात भरत असतील आणि त्यांचे DIES CODE वेगवेगळे असतील अशा परिस्थितीत त्या इमारतीसाठी/आवारासाठी या DIES CODE पैकी फक्त एकाच DIES CODE साठी अनुदान मंजूर करण्यात येईल. संबंधित जिल्हाधिकारी यांनी अनुदान वितरण करण्यापूर्वी शासन निर्णय दि. ७.१०.२०१५ मध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीचे पालन होईल याची दक्षता घ्यावी.या योजनेंतर्गत शाळांना चालू वर्षात ज्या विनिर्दिष्ट प्रयोजनासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे, त्याच प्रयोजनासाठी संबंधित शाळांनी निधी खर्ची टाकावा.

३. शाळा, महाविद्यालय,औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग व नगरपालिका /नगरपरिषद शाळांना अनुदान वितरित करण्यात आल्यानंतर संबंधित शाळा,महाविद्यालय,औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग व नगरपालिका/ नगरपरिषद शाळांनी अनुदान प्रत्यक्ष प्राप्त झाल्यापासून तीन महिन्यांच्या कालावधीत प्रस्तावात नमूद केलेली कामे पूर्ण करणे आवश्यक आहे व त्यानंतर अनुदानाच्या विनियोगाचे विहित नमुन्यातील उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करणे बंधनकारक आहे. सर्व संबंधित शाळा, महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग व नगरपालिका /नगरपरिषद शाळांकडून प्राप्त झालेल्या उपयोगिता प्रमाणपत्रांचा अहवाल संबंधित जिल्हाधिकारी यांनी शासनास व महालेखापाल कार्यालयास सादर करावा. तसेच त्यांनी नियंत्रण अधिकारी म्हणून शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.एयुडी-१०८२/सीआर-९०/८४/कोष-५, दि.२४ सप्टेंबर, १९८६ नुसार सदर निधीच्या खर्चाचा ताळमेळ घालून त्यासंबंधीचे प्रमाणपत्र व सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचा संबंधीत लेखाशिर्षाचा विनियोजन लेखा अहवाल **दि.३० सप्टेंबर, २०१८ पर्यंत** शासनास निश्चितपणे सादर करावा.

४. या योजनेंतर्गत उद्भवणाऱ्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी शासन निर्णय दि.०७.१०.२०१५ मध्ये नमूद संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय निवड समितीस प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. या योजनेंतर्गत होणारा खर्च "मागणी क्र.झेड ई-१, प्रधान लेखाशीर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२, समाजकल्याण २००, इतर कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना (०१) (२१) अल्पसंख्यांक शाळांना पायाभूत सुविधा पुरविणे करिता सहायक अनुदान (२२३५ ए-३४७) ३१ सहायक अनुदान या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ या वर्षाकरिता मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१ वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विअप्र-१०.०८/प्र.क्र.७०/२००८/विनियम दि.१५.०५.२००९, अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त झालेल्या अधिकारांतर्गत / विभागास वेळोवेळी वित्तीय अधिकार नियमपुस्तिका भाग-२ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे. या निधी वितरणासाठी शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.४.२०१७ मधील अटींची पूर्तता होत आहे. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक-अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१८ अन्वये या योजनेकरीता रु. १६.०० कोटी (रूपये १६ कोटी) निधी दिनांक मार्च, २०१८ पर्यंत खर्च करण्यास उपलब्ध आहे. या तरतुदीतून चालू आर्थिक वर्षासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार निधी वितरीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३३११५१९४६४२१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Samir Ramesh Salunkhe

Digitally signed by Samir Ramesh Salunkhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ba9951375d8539e02179fc093b36c7c7d7a866fc20f129ea0ff67bbde52fa539, cn=Samir Ramesh Salunkhe
Date: 2018.03.31 17:00:17 +05'30'

(समीर साळुंखे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा/ विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन,मुंबई.
५. मा. विधानसभा/ विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
७. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. सह सचिव/उप सचिव/ अवर सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
११. महालेखापा १/२ (लेखापरिक्षा), मुंबई/नागपूर
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, वाशिम, बुलडाणा, वर्धा, गडचिरोली
१३. जिल्हाधिकारी, वाशिम, बुलडाणा, वर्धा, गडचिरोली
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम, बुलडाणा, वर्धा, गडचिरोली

१५. जिल्हा नियोजन अधिकारी, वाशिम, बुलडाणा, वर्धा, गडचिरोली
१६. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम, बुलडाणा, वर्धा, गडचिरोली
१७. अवर सचिव (अर्थसंकल्प शाखा), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. कक्ष अधिकारी, का. क्र.७, (अर्थसंकल्प शाखा), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. सर्व संबंधित मदरसा (जिल्हाधिकाऱ्यांमार्फत)
२०. निवडनस्ती.

धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शासनमान्य खाजगी अनुदानित / विना अनुदानित, नगरपालिका, महानगरपालिका शाळा व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना शासन निर्णय क्रमांक अविवि-२०१७/प्र.क्र.१४४/का-६ दि. ३१.०३.२०१८ चे सहपत्र

अ.क्र.	संस्थेचे नाव व शाळेचे नाव	प्रयोजन	अनुदानाचे वर्ष
	अमरावती विभाग, जिल्हा- वाशिम		
१.	परमहंस भगवंत माऊली शिक्षण प्रसारक मंडळ, मंगलधाम, मंगरूळपीर, जि. वाशिम द्वारे संचालित मुकबधीर निवासी विद्यालय, तुळजापुर, ता. मंगरूळपीर, जि. वाशिम	कुलर, फिल्टर व आरो कपाट, खुर्च्या, इन्व्हर्टरव बॅटरी, अध्यापनाची साधने, एल.सी.डी. प्रोजेक्टर इ.	१.
२.	शमीम आझाद एज्युकेशन सोसायटी, गिरोली, ता. मानोरा, जि. वाशिम द्वारे संचालित गुलाम नबी आझाद उर्दु प्रायमरी स्कुल, कारंजा (लाड) जि. वाशिम	वाटर कुलर, फिल्टर एक, शैक्षणिक साहीत्य, खुर्च्या, डेस्क बेंच ७०, टेबल १, इन्व्हर्टरव बॅटरी इ.	१.
	अमरावती विभाग, जिल्हा- बुलडाणा		
१.	वकार एज्युकेशन सोसायटी, कंझारा, ता. खामगांव जि. बुलडाणा द्वारे संचालित मौलाना आझाद उर्दु प्रायमरी स्कुल, ताज नगर, सुटाला खु, ता. खामगांव, जि. बुलडाणा	शैक्षणिक साहीत्य, इंटरनेट, ई-लर्निंग सुविधा इ.	**५**
२.	वकार एज्युकेशन सोसायटी, कंझारा, ता. खामगांव जि. बुलडाणा द्वारे संचालित मौलाना आझाद उर्दु हायस्कुल, अळसणा, ता.शेगांव, जि. बुलडाणा	बोर पंप, डेसक बेंच, टेबल खरेदी, ई-लर्निंग सुविधा इ.	**५**
	नागपूर विभाग, जिल्हा- वर्धा		
१.	अल-एकरा एज्युकेशन सोसायटी, कळंब, जि. यवतमाळ, द्वारे संचालित उर्दु हायस्कुल, शिरपुर,(बोके) , ता. आर्वी, जि. वर्धा.	स्वच्छतागृह बांधकाम	४
	नागपूर विभाग, जिल्हा- गडचिरोली		
१.	रफी अहमद किदवाई मेमोरिअल एज्युकेशन सोसायटी, चंद्रपूर, जि. गडचिरोली द्वारे संचालित रफी अहमद किदवाई मेमोरिअल प्राथमिक शाळा कमलानगर, किदवाई वार्ड, देसाईगंज, वडसा, जि. गडचिरोली	अध्यापनाची साधने (एल.ई.डी.टि.व्ही.५), अध्यापनासाठी लागणारे सॉफ्टवेअर , मोठा स्पीकर-१, लहान स्पीकर-४ इ.	२